# CHALLAN

## MTR Form Number-6

| GRN | MH001174489202627U | BARCODE | ||||||||||||||||||||||| | Date | 21/04/2026-13:27:39 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| Department | District And Sessions Court | **Payer Details** | |
| Type of Payment | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | TAX ID (Case No.) | DSCTAX01 |
| | | PAN No.(If Applicable) | |
| Office Name | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | Full Name | Sushila Baburao Patil |
| Location | KOLHAPUR | | |
| Year | 2026-2027 One Time | Flat/Block No. | |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | Premises/Building | |
| 0070028801 Court Fee | 200.00 | Road/Street | |
| | | Area/Locality | |
| | | Town/City/District | |
| | | PIN | |
| | | Remarks (Party Details) | MHKO17 |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | Amount In Words | Two Hundred Rupees Only |
| Total | 200.00 | | |

DEFACED
₹200.00
DEFACED

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Payment Details | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026042154089 | CPAGPVZYH6 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 21/04/2026-13:24:28 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : CMHKO172026381527L

Mobile No. : XXXXXX3940

**Challan Defaced Details**

| Sr. No. | Remarks | Defacement No. | Defacement Date | UserId | Defacement Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | 0000673799202627 | 21/04/2026-15:00:05 | DSC115 | 200.00 |
| | | | | Total Defacement Amount | 200.00 |

मे. रिपोर्ट — दि: 29.04.2026.

Stamp ची किंमत Rs 200/- आज दि. 29.04.2026 इ. रोजी e-register जमा केली आहे. (रक्कम)

Jadhav

क. लिपिक
नाझिर विभाग

[illegible]

Page 1/1

Print Date 21-04-2026 03:00:09

R.N. Chavan

टीप - कोर्ट फी स्टॅंप रु.२००/- हा GRN MH001174489202627U ने ई चलनव्दारे जमा असे.

अर्जदारातर्फे वकील श्री. व्ही.एच.चावरे

## वारसा प्रमाणपत्र

किरकोळ दिवाणी अर्ज नं.५५/२०२५

नि.नं.२१/बी

१-अ. श्रीमती सुशिला बाबुराव पाटील,
व.व.७०, धंदा - घरकाम,
रा. देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ............ अर्जदार.
१-ब. संजय बाबुराव पाटील,
व.व.४३, धंदा - शेती व नोकरी, रा. सदर
१-क. पुजा बाबुराव पाटील,
लग्नानंतरचे नांव - पुजा चंद्रकांत पाटील,
व.व.३६, धंदा - घरकाम, रा. सदर
२. राजाराम गणपती पाटील,
व.व.६५, धंदा - शेती, रा. सदर
३. रामचंद्र गणपती पाटील,
व.व.६०, धंदा - शेती, रा. सदर

विरुध्द

कोणी नाही ......... वि.प.

बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २
प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी अर्ज

21-04-2026

( श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा

टीप - कोर्ट फी स्टॅंप रु.२००/- हा **GRN MH001174489202627U** ने ई चलनव्दारे जमा असे.

अर्जदारातर्फे वकील श्री. व्ही.एच.चावरे

# वारसा प्रमाणपत्र

किरकोळ दिवाणी अर्ज नं.५५/२०२५

नि.नं.२१/बी

१-अ. श्रीमती सुशिला बाबुराव पाटील,
व.व.७०, धंदा - घरकाम,
रा. देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ............. अर्जदार.

१-ब. संजय बाबुराव पाटील,
व.व.४३, धंदा - शेती व नोकरी, रा. सदर

१-क. पुजा बाबुराव पाटील,
लग्नानंतरचे नांव - पुजा चंद्रकांत पाटील,
व.व.३६, धंदा - घरकाम, रा. सदर

२. राजाराम गणपती पाटील,
व.व.६५, धंदा - शेती, रा. सदर

३. रामचंद्र गणपती पाटील,
व.व.६०, धंदा - शेती, रा. सदर

विरुध्द

कोणी नाही ......... वि.प.

बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी अर्ज

असे प्रमाणित करण्यात येते की,

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि.२३/१२/२०२५ इ. रोजी अर्ज दाखल करुन यातील अर्जदार यांचे मुळ पुरुष गणपती आबा पाटील हे असून ते सध्या मयत आहेत व त्यांची पत्नी ही मयत आहे. गणपती यांना बाबुराव, राजाराम, रामचंद्र असे तीन मुलगे असून आक्काताई ही मुलगी आहे. पैकी मुलगा बाबुराव हा मयत असून त्यास अर्जदार नं.१(अ) ते ३(क) सरळ वारस आहेत व अर्जदार नं.२ व ३ हे मुलगे आहेत. व मुलगी आक्काताई ही दि.२५/१०/२०१४ इ. रोजी मयत आहे. तिला अन्य कोणीही वारस नाही.

मौजे देवाळे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या मिळकती --

| अ.नं. | गट नं. | एकूण क्षेत्र हे-आर | पैकी क्षेत्र हे-आर | आकार रु- पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | २७९ | ०-०६.१० | ०-०६.१० | ००-७५ |
| २. | ५४७ | ०-५४.०० | ०-५४.०० | ००-६८ |
| | | पो.ख.०-०७ | पो.ख.०-०७ | |
| ३. | ५५३ | ०-९४.०० | ०-५१.०० | ०१-०५ |
| ४. | ६६२ | ०-०२.०० | ०-०२.०० | ००-०३ |

येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती हया या दावेचा विषय होय. दावा मिळकती या अर्जदार यांच्या वाडवडीलार्जीत मिळकती असून मयत आक्काताई गणपती पाटील हिचे हिस्सेस तिचे पश्चात अर्जदार नं.१(अ) ते ३(क), २ व ३ हे एकमेव सरळ वारस आहेत. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये मयत आक्काताई गणपती पाटील हिचे हिस्सेस नोंद असणारे क्षेत्र तिचे पश्चात अर्जदार यांना मिळणेस पात्र आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी संदर्भात वारस नातेने सदर अर्जदार यांचे नावाची हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टामध्ये दाखल केलेला आहे.

सदरच्या अर्जाबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदार यांनी दि.२६/०१/२०२४ रोजी दैनिक तरुण भारत, कोल्हापूर मध्ये वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द केलेला आहे. तसेच त्याच्या प्रती दिवाणी न्यायालय यांच्या नोटीस बोर्डावर तसेच गावचावडी देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, मयत व्यक्तींचे घरावर, येथे प्रसिध्द करणेत आल्या, तथापि त्या जाहिरनाम्याच्या व वर्तमानपत्रातील नोटीसच्या अनुषंगाने कोणीही हरकत अथवा तक्रार दाखल केलेली नाही.

सदर कामी मा. न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश पारित केला आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार अर्जदार क्र.१ (अ) ते १ (क), २ व ३ हे मयत आक्काताई गणपती पाटील हिचे सरळ कायदेशिर वारस आहेत असा दाखला देण्यात यावा.

३. प्रस्तुतचा वारसा दाखला अर्ज हा अर्जात नमूद कारणासाठी मजुंर करण्यात येतो.

४. सदरचा वारसा दाखला योग्य तो न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेणेत येवून निर्गमीत करण्यात यावा.

वर नमूद अर्जदार हे मयत कै. आक्काताई गणपती पाटील हिचे वारस असलेबाबत मा. दिवाणी

न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा यांनी सदरचा अर्ज दि. ०७/०४/२०२६ इ. रोजी मंजूर केला आहे. सबब अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र मंजूर करणेत आले आहे.

अर्जदार यांनी सदर प्रमाणपत्राकरीता आवश्यक असणारा न्यायालयीन शुल्काचा मुद्रांक रु.२००/- हा GRN MH001174489202627U ने चलनव्दारे जमा केला असे.

आज दि.२१ माहे एप्रिल सन २०२६ इ. रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

CIVIL JUDGE OF PANHALA पन्हाळा

( श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा

दिवाणी नियमावलीच्या प्रकरण क्रं. १४ च्या परिच्छेद क्रं. ३१२ व ३१३ नुसार तळटीप -

या प्रमापत्राआधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेली मिळकतींची खरी आणि सविस्तर माहिती प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासुन सहा महिन्याच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदारांनी न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. तसेच या प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेल्या मिळकतींचा कशा पध्दतीने वापर करण्यात आला अथवा विल्हेवाट लावण्यात आली याबाबतची माहिती देखील प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून एका वर्षाच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदाराने न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. अशी कोणतीही माहिती न्यायालयास सादर न केल्यास अर्जदार भारतीय दंड विधानाच्या कलम १७६ अन्वये व भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील कलम ३१७,३९० नुसार कार्यवाहीस पात्र राहील.